नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

दिनांक 27/02/2023 (सोमवार) दुपार

## पळवून नेणाऱ्या आरोपीविरूध्द गुन्हा दाखल

**पो.स्टे. उमरेड: –** दिनांक २४/०२/२०२३ चे १३.३० वा. ते १७.३० वा. दरम्यान पो.स्टे. उमरेड हद्यीत यातील फिर्यादीची अल्पवयीन मुलगी वय १६ वर्षे हिला कोणीतरी अनोळखी ईसमाने फिर्यादीच्या कायदेशीर रखवालीतुन फुस लावुन पळवुन नेले आहे.

सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रिपोर्टवरुन पो.स्टे. उमरेड येथे आरोपीविरुध्द कलम ३६३ भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीचा शोध घेणे सुरू असून सदर गुन्हयाचा पुढील तपास सहायक पोलीस निरीक्षक शितल खोब्रागडे मॅडम मो. नं. ८३०८०८२०९४ या करीत आहे.

## फसवणुक

**पो.स्टे. खापरखेडा** :– अंतर्गत ०१ कि मी अंतरावर औष्णिक विद्युत केंद्र खापरखेडा येथे दिनांक २०/०२/२०१९ चे ११.०० वा ते १०/०४/२०१९ चे १७.०० वा. दरम्यान फिर्यादी नामे– भीमराव रामलाल बाजणघाटे, वय ६४ वर्ष रा. महादुला धुडस लेआउट तालुका कामठी हा खापरखेडा येथे राष्ट्रीय मजदूर कॉंग्रेस जनरल सेक्रेटरी या पदावर २०१५ पासून कार्यरत असून कामगारांच्या मागण्यांचे प्रतिनिधित्व करतो. खापरखेडा येथील औष्णिक विद्युत केंद्र खापरखेडा येथील सहा कामगारांचे हक्क मागण्या पूर्ण होण्याबाबत सहा मुद्दयावर औष्णिक विद्युत केंद्र खापरखेडा येथील मुख्य अभियंता यांना ए बी यु कंस्ट्रक्शनचे मालक आरोपी क्रमांक १) भरत नटवरलाल पटेल, रा. धरमपेठ हाईटस नागपूर यांनी त्यांच्या मागण्या पूर्ण करावे अशा आशयाचे पत्र औष्णिक विद्युत केंद्र खापरखेडा यांना दिले होते सदर मागण्यां पैकी केवळ एक मागणी पूर्ण होऊन उर्वरित पाच मागण्या पूर्ण झाल्या नाहीत त्यामुळे यातील फिर्यादीने चौकशी केली असता असे माहित झाले की फिर्यादी कडून लेटर पॅडवर तक्रार मागे घेतल्या बाबतचे पत्र औष्णिक विद्युत केंद्र खापरखेडा यांना प्राप्त झाले आहे. फिर्यादीने असे कोणतेही पत्र दिले नसल्याने आर टी आय च्या माध्यमातून सदरचे पत्र प्राप्त केले प्राप्त पत्रात दिनांक १०/०४/२०१९ रोजी हक्क मागण्या वापस घेतल्या बाबतचे पत्र होते ते फिर्यादीने दिले नव्हते फिर्यादीच्या लेटर पॅडच्या बनावटीकरण करून त्यावर खोटी स्वाक्षरी करून ते पत्र संबंधित कार्यालयाच्या आवक जावक विभागात न देता परस्पर आरोपी क्रमांक १) याने आरोपी क्रमांक २) विश्वास सोमकुरे रा. खापरखेडा सावनेर खापरखेडा नागपूर यांच्याशी संगणमत करून आरोपी क्रमांक २) यांना परस्पर दिले ते खोटे व बनावटी असतांना सुद्धा ते न पडताळता आरोपी क्रमांक १) यांना वाचवण्याच्या उद्देशाने आरोपी क्रमांक २) यांनी स्वीकारले फिर्यादीने संबंधित कार्यालयात दाद मागितली असता त्याचे तक्रारीची दखल न घेतल्याने फिर्यादीने माननीय जे एम एफ सी कोर्ट सावनेर येथे तक्रार दाखल केली त्यावर माननीय न्यायालयाने कलम १५६(३) जाफौ अन्वये आदेश पारित केले.

सदर प्रकरणी फिर्यादी यांचे रिपोर्ट वरुन पो.स्टे. खापरखेडा येथे आरोपीविरुध्द कलम ४६५, ४६८, ४७१ भादवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीतांचा शोध घेणे सुरु आहे. सदर गुन्हयाचा पुढील पोलीस उपनिरीक्षक प्रितम निमगडे पोस्टे खापरखेडा मो. नं. ८९९९९१७११२ हे करीत आहे.

**पोलीस माहिती कक्ष**
**नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर**